


सोमवंशी पाठारे क्षत्रिय समाजोन्नति संघ
नोंदणी क्र. ए-३९५ (मुंबई)
कै. गंगाधर पिलाजी चौधरी व कै. रघुवीर पाटील यांच्या स्मृतीस समर्पित

# त्रैमासिक वृत्तपत्रिका



अंक : १३२ ऑक्टोबर : २०१४ वर्ष : ३७

✻ संपादक
विनय रघुनाथ राऊत
९८२३२५१९४७
✻ सहसंपादक
वंदेश दे. पुरव
तरंग ज. पाटील
सुचिता प्र. पाटील
दिपक ना. पाटील
मेघा रो. पाटील
✻ विश्वस्त
यशवंत ना. राऊत,अध्यक्ष
८००७३१९३५१
भरत ना. ठाकूर
विरेंद्र न. पाटील
हेमंत ना. राऊत
अनंत दा. राऊत
प्रमोद ज. राऊत
विमल र. राऊत
✻ सल्लागार
लोकनेते हितेंद्र वि. ठाकूर
आमदार कपिल ह. पाटील
आमदार क्षितिज हि. ठाकूर
✻ संघाचे अध्यक्ष
श्री. अशोक नारायण पाटील
८०८७१०४१४१
✻ मुख्य चिटणीस
यशवंत नारायण राऊत
✻ खजिनदार
विजय द. पाटील
✻ सहचिटणीस
अभिजीत प्र. राऊत
अभय ज. राऊत
✻ गृहपाल
दीपक ना. पाटील
९२२१६३४०९४
अशोक मो. पाटील
प्रभाकर गो. ठाकूर
✻ ग्रंथपाल
रविंद्र स. राऊत

संपादकीय

## समाजमंदिर - काळाची गरज

सोमवंशी पाठारे क्षत्रिय समाजोन्नति संघाची स्थापना ३ एप्रिल १९१० रोजी नरपड येथे श्री. रामजी केशव राऊत यांच्या प्रांगणात झाली. सर्वश्री कै. काशिनाथ वालजी राऊत हे संघाचे पहिले अध्यक्ष. पुढे डॉ. मधुकर ब. राऊत, गंगाधर पि. चौधरी, जनार्दन पां.राऊत, रघुवीर ठ. पाटील, अरविंद हरि राऊत यासारख्या थोर समाजसेवकांनी संघाला मार्गदर्शन करुन ग्रामीण भागात पसरलेल्या समाजबांधवांना स्त्रीशिक्षण व उच्च शिक्षण घेण्यास मार्गदर्शन करून प्रवृत्त केले. त्याचा मूलगामी परिणाम म्हणून पुढील पिढ्या सुशिक्षित होऊन आपल्या पायावर उभ्या राहिल्या. वरील समाजधुरिणांचा आदर्श घेऊन अनेक तरुणांनी सामाजिक कार्यात सहभागी होऊन गावोगावी समाजकार्य केले व समाजाची सांस्कृतिक, शैक्षणिक व आर्थिक उन्नती करण्याचा अथक प्रयत्न केला. शिक्षणाचे महत्त्व ओळखून समाजातर्फे गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत देण्यास सुरुवात केली. आजही ''समाजाची शैक्षणिक मदत घेऊन मी शिकलो म्हणून मी समाजाचा ऋणी आहे'' असे अभिमानाने सांगणारे आहेत. परंतु बदलत्या काळाचे भान लक्षात न आल्याने व भविष्याकडे दुर्लक्ष झाल्याने मुंबई शहरात किंवा उपनगरात सोपाक्षस संघाचे समाजमंदिर उभे राहू शकले नाही.

समाजसविता डॉ. मधुकर ब.राऊत यांच्या मृत्युनंतर समाजधुरिणांनी डॉ. मधुकर ब. राऊत स्मारक, पालघर येथे उभे केले. काळानुरुप ह्या सभागृहाचा वापर केवळ व्यवस्थापक मंडळाच्या सभा व वार्षिक सभा यापुरते मर्यादित राहिले. सध्याच्या विद्यमान गृहपालांच्या प्रयत्नाने अधूनमधून लग्न, साखरपुडा, वाढदिवस इ. कार्यक्रमास हे सभागृह भाड्याने देण्यास सुरुवात झाली आहे. पालघर येथील दुबे बंधुनी त्यांचे वडील कै. बच्चूलाल शंकर दुबे यांच्या नावे समाजास पालघर पूर्वेस १२ गुंठे जमीन दान केली. संघाच्या पहिल्या महिला अध्यक्षा डॉ. हिराबाई भाऊराव पाटील यांनी त्या जागेत कै. भाऊराव देवजी पाटील यांच्या नावे वसतीगृह उभारण्यासाठी

दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा

आर्थिक मदत केली. कै. पुष्पकांत म्हात्रे व कै. पांडुरंग सु. राऊत यांच्या प्रयत्नामुळे दहिसर (पश्चिम), मुंबई येथे ज.पां.राऊत वसतीगृहासाठी सदनिका घेतली गेली. तिचा वापर मुंबई येथील संघाच्या कार्यालयीन कामासाठी तसेच  इतर समितीच्या बैठकी साठीच होत आहे.

संघाने कै. मधुकर ब. राऊत यांच्या अध्यक्षतेखाली रौप्यमहोत्सवी, कै. अरविंद ह. राऊत यांच्या अध्यक्षतेखाली सुवर्ण महोत्सवी,  कै. पुष्पकांत अ. म्हात्रे यांच्या अध्यक्षतेखाली हिरकमहोत्सवी, श्री. राजीव यशवंत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली अमृतमहोत्सवी, श्री. शशांक रघुवीर पाटील यांच्या अध्यक्षतेखाली शताब्दी महोत्सवी अधिवेशने तसेच डॉ. मधुकर ब. राऊत जन्मशताब्दी महोत्सव यशस्वीरित्या आयोजित केले. ह्यावर्षी पं.वि.चालनाकार अरविंद राऊत यांचा जन्मशताब्दी महोत्सव चालू आहे तो हि यशस्वी होईल. दरवर्षी गावोगावी संघाची अधिवेशने होतात. यात सर्व समाज बंधु भगिनी एकमेकांना भेटतात. हुषार विद्यार्थी, जुने कार्यकर्ते, गुणवंतजन यांचे सत्कार व भाषणातुन समाजप्रबोधन यापुढे कुठलेही ईप्सित आजवर साध्य झालेले नाही. चर्चगेट डहाणू लोकल सुरु झालेली आहे. दि. १ ऑगस्ट २०१४ रोजी ठाणे जिल्ह्याचे विभाजन होऊन नवा 'पालघर जिल्हा' अस्तित्वात आला आहे. आठ तालुक्याचे मध्यवर्ती ठिकाण म्हणून पालघरला मान्यता मिळाली आहे. अशावेळी काळाची एक गरज ध्यानात घेऊन पालघर येथे समाजाचे समाजमंदिर व्हावे हे सर्व समाजबांधवांनी लक्षात घ्यावे अशी इच्छा मी मनोमन व्यक्त करतो.

कै. वसंत गंगाधर चौधरी यांनी मुंबईत वास्तु उभी करण्याचा प्रयत्न केला होता पण त्यास गती मिळाली नाही. श्री. जयप्रकाश दे. राऊत अध्यक्ष असताना केळवे येथे झालेल्या समाजातील कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात समाजमंदिर उभे करायचे अशी आग्रही भूमिका सर्व कार्यकर्त्यांनी घेतली होती. संघातर्फे समाजमंदिर उभारणीसाठी एक बहुउद्देशीय वास्तू निर्मिती कोअर समिती स्थापन केली आहे. ह्या समितीने सर्व निकषांचा परामर्श घेऊन पालघर पूर्व येथे असलेल्या जागेत सर्वांचा विचार घेऊन वास्तू उभारावी असे सुचविले आहे. विस्तृत अहवाल व्यवस्थापक मंडळाच्या सभेत संमत झालेला आहे. आपल्या डोळ्यासमोर मुंबई ते डहाणू या परिसरात इतर समाजाच्या वास्तू असून त्यात सामाजिक कार्य काळानुरुप घडत आहे. अशावेळी पालघर येथे संघाची बहुउद्देशीय वास्तू पूर्ण करण्यासाठी सर्व समाजबांधवानी खंबीरपणे संघाच्या मागे उभे राहिले पाहिजे.

समाजातील दानशूर उद्योजक समाजसेवक श्री. राजाराम रघुनाथ पाटील यांनी समाजमंदिर उभारणीसाठी रुपये ५० लक्ष देणगी देण्याचे अभिवचन दिले असून त्यापैकी रुपये १० लक्ष संघाच्या खजिन्यात जमा केलेले आहे. संघाचे अधिदाता आणि सिव्हिल व स्ट्रक्चरल अभियंता श्री. पराग प. राऊत यांनी ह्यासाठी लागणारे कुठल्याही प्रकारचे अभियांत्रीकी सहकार्य विनामूल्य देण्याचे तयारी दर्शविली आहे. समाजातील सर्व बंधूभगिनींना विनंती आहे आपण सर्वांनी संघाची बहुउद्देशीय वास्तू उभारण्यासाठी, एक समाजमंदिर उभारण्यासाठी 'उत्तिष्ठत, जाग्रत, प्राप्यवरान् निबोधत।' या उक्तीप्रमाणे उठू या, जागे होऊ या. समाजमंदिराची पायाभरणी करून बहुउद्देशीय वास्तू उभी करण्याकरिता आर्थिक सहाय्य करुन समाजाची अत्यंत निकडीची गरज पूर्ण करून संघाचे विद्यमान अध्यक्ष श्री. अशोक नारायण पाटील व यापुढे होणाऱ्या अध्यक्षांच्या मागे खंबीरपणे उभे राहू या.

''एकमेका साह्य करु ।  अवघे धरु सुपंथ ।।''

❑ ❑ ❑

# विज्ञाननिष्ठा वाढविणारी विज्ञानमंदिरे हवीत

हे विज्ञानयुग आहे. सर्व मानवसमाज विज्ञाननिष्ठ झाला पाहिजे. विज्ञानामुळेच या महान विश्वाचं कोडे केव्हातरी सुटू शकेल. अशी विधाने आपण वाचतो. मोठमोठ्या व्यक्तींच्या भाषणातून ऐकतो पण विज्ञानाच्या प्रगतीसाठी बहुजन समाजाकडून तशी कृती होते का? केवळ काळाच्या वाढत्या प्रवाहाने विज्ञान पुढे जात आहे. शास्त्रज्ञांच्या बुद्धीने त्यात भर पडत आहे. पण यात समाजाची निष्ठा मात्र अभावानेच दिसते. मात्र एखादा शोध विज्ञानाने सिद्ध झाल्यावर त्याचा लाभ समाज उठवितो पण त्याचे श्रेय तो त्या वैज्ञानिकाला किंवा त्याच्या ज्ञानाला देणार नाही. ते श्रेय त्या तथाकथित देवाला जाईल. डोळसबुद्धीने आपल्या निष्ठेचा विचार तो करणार नाही.

एका बाजूला विज्ञान वाढत आहे असे आपण म्हणतो पाहातो पण त्या उलट दुसऱ्या बाजूला आध्यात्मिक अंधश्रद्धाही अधिक वेगाने वाढताना दिसते. देवळाचे जीर्णोद्धार होत आहेत. नवीन देवळे बांधली जात आहेत, देवापुढील रांगा वाढत आहेत. तीर्थक्षेत्रे-जत्रा यातील गर्दीना उधाण येत आहे. नवे नवे बुवा निर्माण होत आहेत आणि ज्या सुशिक्षित तरुणांनी हे विज्ञानयुग पेलावयाचे आहे तो तरुणवर्गच यात अधिक सहभागी झालेला दिसतो ही शोकांतिका आहे. एकदा आगगाडीतून जाताना काही कॉलेज विद्यार्थी समोर बसले होते त्यांच्या बोलण्यावरुन व त्यांच्या हातातील साहित्यावरुन ते विज्ञानशाखेचे विद्यार्थी होते हे ओळखता आले. त्यांच्याकडे पाहिले तर काहींच्या गळ्यात ताईत बांधले होते तर काहींच्या गळ्यात साईबाबांचा फोटो असलेले लॉकेट होते. या विद्यार्थ्यांची विज्ञानावर कितीशी निष्ठा असणार? परीक्षा पास होण्यासाठी विज्ञान शिकायचे एवढी त्यांची दृष्टी. त्यांच्या एखाद्या प्राध्यापकाने ही गोष्ट सहज विनोदाने तरी त्या मुलांच्या लक्षात का आणून दिली नाही? कोणी सांगावे प्राध्यापकाच्या गळ्यातसुद्धा साईबाबा किंवा संतोषीमातेचे लॉकेट असणे असंभवनीय नाही.

विज्ञानाचा झेंडा उंच फडकवतील असे शिक्षण नव्या पिढीला मिळत नाही, ते दिले पाहिजे. प्रत्येक गावी विज्ञानमंदिरे बांधली पाहिजेत. त्या मंदिरातून विज्ञानाची माहिती बहुजन समाजाला करुन दिली पाहिजे. नवे नवे शोध शास्त्रीय पद्धतीने दाखविले पाहिजेत. यासाठी तरुणांनी पुढाकार घेतला पाहिजे. हल्ली काही बुबा या भगवान विज्ञानात घोळून आध्यात्मिक अंधश्रद्धेची गोळी लोकांना देत आहेत. त्यांची लबाडी उघडकीस आणली पाहिजे. विज्ञानमंदिरासाठी व विज्ञानविषयक वातावरण तयार करण्यासाठी सरकारकडून फारशी मदत मिळेल अशी अपेक्षा करण्यात अर्थ नाही. कारण याच लोकातून सरकार बनलेले असते. वास्तविक, विज्ञाननिष्ठा वाढविणाऱ्या व बुद्धिप्रामाण्यवाद शिकवणाऱ्या काही थोड्या संस्था भारतात आहेत. त्यांना सरकारने भरघोस मदत केली पाहिजे. पण तशी मदत होत नाही. आजच्या सर्व देवळांच्या निधीतून विज्ञानमंदिरे बांधली तर काट्याने काटा काढता येईल. पण अशी क्रांती करणारे वेगळ्या प्रकारचे सरकार आले तर शक्य आहे. नाही तर मंत्रिपदासाठी वा अधिकारासाठी आम्ही देवळाचे उंबरठे झिजवीत आहोतच.

**चालनाकार अरविंद राऊत**

**प्रबोधन व प्रहार**

# स्नेहवर्धक मंडळ नरपड यांच्यातर्फे साजरी करण्यात आलेली चालनाकार अरविंद राऊत जन्मशताब्दी

चालनाकार अरविंद राऊत यांच्या जन्मगावी नरपड, ता. डहाणू, जि. पालघर येथे स्नेहवर्धक मंडळ व इतर संस्थातर्फे दि. २४ ऑगस्ट २०१४ रोजी दुपारी ३ वाजता अन्नपूर्णा म्हात्रे सभागृहात जन्मशताब्दीचे दुसरे पर्व घडले. बोर्डी येथील सु.पे.ह. हायस्कुलचे माजी मुख्याध्यापक व चालनाकारांचे विद्यार्थी श्री. एन.के.पाटील सर ह्या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे होते. प्रारंभी जन्मशताब्दी समितीचे अध्यक्ष श्री. बाळकृष्ण न. राऊत ह्यांनी प्रास्तविक करुन जन्मशताब्दी वर्षातील कार्यक्रमाची व गौरवग्रंथाची माहिती दिली. प्रमुख पाहुण्यांना शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. त्यानी चालनाकारांच्या आठवणींना उजाळा दिला. गौरवग्रंथीचे संपादक श्री. अशोक ना. पाटील ह्यांचा सो.पा.क्ष.स.संघाचे अध्यक्ष झाल्याबद्दल शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. त्यानीही चालनाकारांच्या आठवणी सांगितल्या. चालनाकारांची बहिण श्रीम. इंदुमती चं.पाटील ह्यांनी आपल्या दादाच्या स्मृती जागृत केल्या. अनंत दा. राऊत, क्षात्रैक्य परिषदेचे अध्यक्ष अशोक घरत, स्नेहवर्धक मंडळाचे अध्यक्ष दिलीप राऊत ह्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. जन्मशताब्दी वर्षाचे औचित्य साधून क्षात्रैक्य परिषदेतर्फे ८० विद्यार्थ्यांना वह्या वाटप करण्यात आले. श्री. दिनेश रा.पाटील ह्यानी आभार मानल्यावर राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली. स्नेहवर्धक मंडळाचे विश्वस्त शिवनाथ पाटील,विश्वस्त दिनेश पाटील यांनी कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी विशेष परिश्रम घेतले.

❑ ❑ ❑

# व्यवस्थापक मंडळ त्रैमासिक सभा

सो. पा. क्ष. स.संघाच्या व्यवस्थापक मंडळाची सन २०१४-१५ सालातील पहिली त्रैमासिक सभा रविवार दिनांक ३ ऑगस्ट २०१४ रोजी संघाचे मान. अध्यक्ष श्री. अशोक नारायण पाटील यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. प्रथम मुख्य चिटणीस श्री. यशवंत ना. राऊत यांनी उपस्थित सभासदांचे स्वागत केले. सभेच्या सुरुवातीस दिवंगत समाज बंधू भगिनींना श्रद्धांजली वाहण्यात आली. तदनंतर नवीन नियुक्त सभासद व विशेष यश संपादन केलेल्या समाज बंधू भगिनींचे अभिनंदन करण्यात आले.

सभेमध्ये मागील त्रैमासिक सभेचे इतिवृत्त वाचून त्रैमासिक जमाखर्च सादर करण्यात आला. अंदाजपत्रकास मंजूरी घेण्यात आली. सदर सभेत संघनियुक्त कार्यकारी समित्या व उपसमित्यांची निवड करण्यात आली. संघाचे सारस्वत बँकेत नवीन खाते उघडण्यासंदर्भात माहिती देण्यात आली. इतर विषयांमध्ये वास्तूसाठी निधी जमविणे, शैक्षणिक मदतीसंदर्भात निर्णय घेणे, कोर्टात दाखल केलेल्या दाव्यासंबंधी करावयाचा ठराव याबाबत चर्चा करण्यात आली. त्रैमासिक वृत्तपत्रिकेचा खर्च कमी करण्यासाठी जाहीरात व नैमत्तिक देणग्या स्विकारल्या जातात अशी माहीती संपादक श्री. विनय राऊत यांनी दिली.

निरनिराळ्या समित्यांचे अहवाल सादर केल्यावर मान. अध्यक्ष श्री. अशोक पाटील यांनी आपल्या भाषणात नवीन वास्तू बांधण्यासाठी निधी गोळा करण्याचा प्रस्ताव मांडला. युवक व उद्योजकांचे मेळावे घेऊन त्यांना संघकार्यात आणण्याचा प्रयत्न करणे आवश्यक आहे आणि त्यासाठी शाखाध्यक्ष व शाखाचिटणीस यांच्यासोबत नियुक्त सभासदांचे सहकार्य घ्यावे लागेल असे सांगून त्रैमासिक वृत्तपत्रिका चांगल्या प्रकारे काढल्याबद्दल त्यांनी संपादकांचे अभिनंदन केले. समारोप करताना लोकसंपर्क वाढविण्याच्या दृष्टीने सर्वांनी प्रयत्न करुन सहकार्य करावे असे त्यांनी आवाहन केले. आभारप्रदर्शनाने सभेची सांगता करण्यात आली.

❑ ❑ ❑

# कार्यकारी समित्या
# (२०१४-१७)

## संघटना व सर्वाधारण व्यवसथापन

| | | | | |
|---|---|---|---|---|
| श्री. यशवंत नारायण राऊत | अध्यक्ष | श्री. सुधीर आत्माराम राऊत | 9820575195 | कार्याध्यक्ष |
| श्री. अभय जयराम राऊत | निमंत्रक | श्री. श्रीकांत लक्ष्मण राऊत | | सदस्य |
| श्री. मंगेश गणपत पाटील | सदस्य | श्री. दिलीप हरिश्चंद्र राऊत | | सदस्य |
| श्री. भुवनेश्वर मुकुंद राऊत | सदस्य | श्रीम. दामिनी गोपीनाथ राऊत | | सदस्या |

## स्थावर मालमत्ता निर्मिती, वापर व व्यवस्थापन

| | | | | |
|---|---|---|---|---|
| श्री. भरत नारायण ठाकूर | अध्यक्ष | श्री. जितेंद्र रमाकांत पाटील | 9850879366 | कार्याध्यक्ष |
| श्री. प्रभाकर गोविंद ठाकूर | निमंत्रक | श्री. दीपक नानाजी पाटील | | सदस्य |
| श्री. पराग परशुराम राऊत | सदस्य | श्री. अशोक मोरेश्वर पाटील | | सदस्य |
| श्रीम. दीपा देवेंद्र राऊत | सदस्या | | | |

## कृषी विकास

| | | | | |
|---|---|---|---|---|
| श्री. अनंत दामोदर राऊत | अध्यक्ष | श्री. दिनेश वासुदेव पाटील | 9225898159 | कार्याध्यक्ष |
| श्री. गोपीनाथ ठक्या पाटील | निमंत्रक | श्री. अजय गणपत पुरव | | निमंत्रक |
| श्री. राजेंद्र पदमनाभ राऊत | सदस्य | श्री. देवेंद्र गोविंद राऊत | | सदस्य |
| श्री. चंद्रकांत वामन पाटील | सदस्य | श्रीम. विनीता अजय राऊत | | सदस्या |

## शिक्षण, कला व सांस्कृतिक विकास

| | | | | |
|---|---|---|---|---|
| श्री. हेमंत नारायण राऊत | अध्यक्ष | श्रीम. शैला अशोक पाटील | 8087980689 | कार्याध्यक्षा |
| श्री. निलेश सुरेंद्र राऊत | निमंत्रक | श्रीम. आशा मधुकर पाटील | | सदस्या |
| श्री. प्रणिता पंकज ठाकूर | सदस्या | श्री. सुरेश वामन पाटील | | सदस्य |
| श्रीम. तृप्ती नरेंद्र पाटील | सदस्या | | | |

## व्यापार, उद्योग विकास व सहकार

| | | | | |
|---|---|---|---|---|
| श्री. विरेंद्र नरोत्तम पाटील | अध्यक्ष | श्री. संजय नारायण पाटील | 9226939065 | कार्याध्यक्ष |
| श्री. विनय रघुनाथ राऊत | निमंत्रक | श्री. चंद्रकांत वामन पाटील | | सदस्य |
| श्री. जयेश रामचंद्र राऊत | सदस्य | श्री. जगदीश रघुनाथ पाटील | | सदस्य |
| श्रीम. हेमा दीपक ठाकूर | सदस्या | | | |

## आरोग्यसेवा

| | | | | |
|---|---|---|---|---|
| श्री. प्रमोद जनार्दन राऊत | अध्यक्ष | श्री. अरविंद रामचंद्र पाटील | 9869068792 | कार्याध्यक्ष |
| श्री. प्रशांत सागर पाटील | निमंत्रक | श्री. श्रीकांत लक्ष्मण राऊत | | सदस्य |
| श्री. नागेश सदाशिव राऊत | सदस्य | श्री. विजय जनार्दन राऊत | | सदस्य |
| श्रीम. रुचिता रमेश पाटील | सदस्या | श्रीम. शीला विश्वनाथ राऊत | | सदस्या |

## युवा विकास

| | | | | |
|---|---|---|---|---|
| श्री. अनंत दामोदर राऊत | अध्यक्ष | श्री. गिरीश लक्ष्मण राऊत | 9850140780 | कार्याध्यक्ष |
| श्री. आनंद यशवंत राऊत | निमंत्रक | श्री. निलेश सुरेंद्र राऊत | | सदस्य |
| श्री. तरंग जयप्रकाश पाटील | सदस्य | श्रीम. नीता अविनाश ठाकूर | | सदस्या |
| श्रीम. रश्मी रघुवीर राऊत | सदस्या | | | |

## महिला विकास

| | | | | |
|---|---|---|---|---|
| श्रीम. विमल रघुनाथ राऊत | अध्यक्षा | श्रीम. निलम विकास राऊत | 7276703696 | कार्याध्यक्षा |
| श्रीम. रुपा विनय राऊत | निमंत्रक | श्रीम. शालिनी शामराव पाटील | | सदस्या |
| श्रीम. वनिता सूर्यकांत चौधरी | सदस्या | श्रीम. अदिती अविंद्र पाटील | | सदस्या |
| श्रीम. कृपाली मुकेश पाटील | सदस्या | | | |

## श्री. राजाराम रघुनाथ पाटील उच्चशिक्षण शिष्यवृत्ती समिती सभासद

| | |
|---|---|
| श्री. अशोक नारायण पाटील | अध्यक्ष, सो.पा.क्ष.स.संघ (पदसिध्द) |
| श्री. यशवंत नारायण राऊत | अध्यक्ष, विश्वस्त समिती (पदसिध्द) |
| श्री. विजय दशरथ पाटील | खजिनदार, सो.पा.क्ष.स.संघ (पदसिध्द) |
| श्री. अभय जयराम राऊत | मुख्य/ सहचिटणीस सो.पा.क्ष.स.संघ (पदसिध्द) |
| श्री. तरंग जयप्रकाश पाटील | सदस्य |
| श्री. प्रभाकर गोविंद ठाकूर | सदस्य |

## अंतर्गत हिशोब तपासनीस - २०१४-१५

श्री. किशोर हरिश्चंद्र राऊत          श्री. रोशन नारायण पाटील

# उपसमित्या (अहवाल साल २०१४-१५)

## वृत्तपत्र संपादन समिती

| | | | |
|---|---|---|---|
| श्री. विनय रघुनाथ राऊत | संपादक | श्री. वंदेश देवदी पुरव | सदस्य |
| श्री. दीपक नानाजी पाटील | सदस्य | श्री. तरंग जयप्रकाश पाटील | सदस्य |
| श्रीम. सुचिता प्रविण पाटील | सदस्या | श्रीम. मेघा रोशन पाटील | सदस्या |

## शैक्षणिक मदत समिती

| | | | |
|---|---|---|---|
| श्री. मंगेश गणपत पाटील 9637183670 | अध्यक्ष | श्री. अभिजीत प्रकाश राऊत | निमंत्रक |
| श्री.मधुकर नाना पाटील | सदस्य | श्री. अशोक मोरेश्वर पाटील | सदस्य |
| श्री. भुवनेश्वर मुकुंद राऊत | सदस्य | श्री. किशोर रामचंद्र ठाकूर | सदस्य |
| श्रीम. मेघा रोशन पाटील | सदस्या | | |

## निबंध स्पर्धा समिती

| | | | |
|---|---|---|---|
| श्री. पंकज दत्तात्रय पाटील 8793631197 | अध्यक्ष | श्रीम. अस्मिता विनय पाटील | निमंत्रक |
| श्रीम. हेमलता नरेंद्र पाटील | सदस्या | श्रीम. कविता किशोर ठाकूर | सदस्या |
| श्रीम. उत्कर्षा वंदेश पुरव | सदस्या | | |

## संगीत व वक्तृत्व स्पर्धा

| | | | |
|---|---|---|---|
| श्री.नरेंद्र देवराव राऊत 9226941789 | अध्यक्ष | श्री. तरंग जयप्रकाश पाटील | निमंत्रक |
| श्री. नागेश रामचंद्र ठाकूर | सदस्य | श्री. राजेंद्र देवजी पुरव | सदस्य |
| श्रीम. स्वजल वल्केश राऊत | सदस्य | श्रीम. अर्चना योगेश राऊत | सदस्या |
| श्री. हिमांशु अनिल पाटील | सदस्य | श्रीम. प्रणाली योगेश राऊत | सदस्या |

## क्रीडा स्पर्धा समिती

| | | | |
|---|---|---|---|
| श्री. गिरीश लक्ष्मण राऊत | अध्यक्ष | श्री. रुचित दीपक पाटील | निमंत्रक |
| श्री. गिरीश गणपत राऊत | सदस्य | श्री. भौतेश जयवंत पाटील | सदस्य |
| श्री. निशांत शिवनाथ पाटील | सदस्य | श्री. प्रियाल रमेश पुरव | सदस्य |
| श्री. वैभव हितेंद्र पाटील | सदस्य | श्रीम. स्नेहल सिध्देश पाटील | सदस्या |
| श्री. शशांक हेमंत पाटील | सदस्य | | |

## वधुवर सूचक समिती

| | | | |
|---|---|---|---|
| श्रीम. विमल रघुनाथ राऊत | अध्यक्षा | श्रीम. प्रणिता पंकज ठाकूर 9860821666 | कार्याध्यक्षा |
| श्रीम. दर्शना दिनेश पाटील | निमंत्रक | श्रीम. मीनल प्रकाश राऊत | सदस्या |
| श्रीम. रुपा विनय राऊत | सदस्या | श्रीम. शालिनी सुरेश पाटील | सदस्या |
| श्रीम. कल्पना किशोर राऊत | सदस्या | श्रीम. वनिता सूर्यकांत चौधरी | सदस्या |
| श्री. दिपक नानाजी पाटील | सदस्य | | |

पं. वि. चालनाकार अरविंद ह. राऊत
यांच्या स्मृतीस अभिवादन

Suresh W. Patil
9890352367
(02525) 284690

# CHIRAG PRINTERS

**Industrial & Commercial Printers**

E-mail : chiragprinters.swp@gmail.com

At. Betegaon, P.O. Boisar,
Tal. Palghar, Dist Thane

पं. वि. चालनाकार अरविंद ह. राऊत
यांच्या स्मृतीस अभिवादन

कमळाकर भाऊ राऊत          संजय कमळाकर राऊत

(M) - 9766565504, 9860221190
9273985971, 9823791612
(R) (02525) 628315

## HARDIK (बंटी)

# EARTH MOVERS & TRANSPORT



**Building Material Suppliers**
**&Carting Agent**

At. Betegaon, Post Boisar, Tal. Palghar,
Dist. Thane - 401 501

पं. वि. चालनाकार अरविंद ह. राऊत यांच्या स्मृतीस अभिवादन

चंद्रकांत पाटील
S.E.O.



९८९०३८७११५
ऑ. - ०२५२५ - २८४१३७
घर - ०२५२५ - २८४६६३

# किर्ती किचन वेअर

**आमच्या येथे सर्व प्रकारची स्टीलची स्टॅन्ड (मांडणी) तयार केली जाते.**

मु. बेटेगाव, पो. बोईसर,  ता. पालघर, जि. ठाणे

## अभिनंदन

अदिती रजनीकांत राऊत - सालवड, बी.ई.आयटी. प्रथम वर्ग
जितेंद्र चंद्रकांत पाटील - बेटेगाव MBA (Finance) प्रथम वर्ग
हरिता भुपेंद्र पाटील - विरार (वरोर) बॅचरल ऑफ आर्किटेक्ट
हरेश कमळाकर राऊत - पोफरण, बॉयलर ऑपरेशन इंजिनिअर
प्राची सुरेंद्र पाटील - नरपड, बी. फार्म. प्रथम वर्ग
प्रियाल सुजित पाटील - केळवे, Dip. in Ind. Elect. प्रथम वर्ग
कनद राजेंद्र पाटील - केळवे Dip. in Comp. Eng. प्रथम वर्ग
नैनीषा सुहास पाटील - नरपड Dip. in Comp. Eng. प्रथम वर्ग
काजल प्रभाकर राऊत - नरपड, MA प्रथम वर्ग
नितीशा जितेंद्र राऊत - नरपड, B.Sc. प्रथम वर्ग
तृप्ती भालचंद्र राऊत - नरपड B.Sc. प्रथम वर्ग
नमित प्रभाकर राऊत - नरपड B.Com प्रथम वर्ग

### १२ वी

तन्वी नितीन पाटील - नांदगाव, वाणिज्य ८२.४६%
हर्षद राजेश पाटील - पोफरण, वाणिज्य
रिया सुरेंद्र पाटील - केळवे, वाणिज्य
कुंजल मधुकर पाटील - नरपड, शास्त्र
हीनल देवेंद्र राऊत - नरपड, शास्त्र
सुयोग राजेंद्र राऊत - नरपड, शास्त्र
मृण्मयी महेश पाटील - नरपड, कला
अंकिता रमाकांत राऊत - नरपड, कला
चिन्मय संदेश पाटील - नरपड, वाणिज्य
पार्थ मिलींद राऊत - नरपड, शास्त्र

### १० वी

शलाका प्रफुल पाटील - पालघर, ९१.२ %
रचित हरिहर राऊत - माहिम, ९०.४%
मनस्वी अशोक पाटील - बेटेगाव ८७.६ %
अभिषेत राजेंद्र पाटील - ठाणे, ८७.४ %
अर्चित संजीव पाटील - नांदगाव, ८२.३३ %
दिपेश विनोद पाटील - जुहू, ८२.०० %
विक्रांत सुनिल राऊत - जुहू
आदित्य विक्रम पाटील - मिरारोड - नरपड
दिव्यश्री भूषण पाटील - घिवली
शुभम प्रविण ठाकूर - पंचाळी
तेजल शैलेंद्र राऊत - पंचाळी
सुमित किशोर राऊत - पंचाळी
दिक्षा राजेंद्र पाटील - पंचाळी
मयुरेश हितेश पाटील - माहीम
स्मित महेश पाटील - माहीम
वेदिका राजेंद्र राऊत - माहीम
ओवी पुष्पेंद्र राऊत - नरपड
ध्रुवीन किशोर पाटील - नरपड
हर्षिता सुहास पाटील - नरपड
ऐनेश अनिल पाटील - नरपड
कुशाणु महेश पाटील - नरपड
कुंजल नितेंद्र राऊत - नरपड
दिव्या प्रविण राऊत - नरपड
कनिष्क जयवंत पाटील - मधुकरनगर

### ७ वी स्कॉलरशिप

मुग्धा बिपीन राऊत - अल्याळी (विरार)
ओंकार कौशिक पुरव - मधुकरनगर

---

**सुगंधा संजय पाटील - सालवड ग्रामपंचायत सरपंच पदी निवड**

---

### विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्ती

हार्दिक रविंद्र राऊत - विरार - माहीम
स्वप्निल सुरेश पाटील - विरार - वरोर
सुहास सुरेश पाटील - विरार - वरोर

**समाजवृत्त**

क्षात्रैक्य परिषदेची ६४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा दि.१४-१०-२०१४ रोजी दादर येथे श्री अशोक घरत यांच्या अध्यक्षतेखाली वाजता पार पडली. क्षात्रैक्य परिषदेचा ६५ वा वर्धापन दिन दि. १२-१०-२०१४ रोजी वर्तक सभागृह, दादर येथे परिषेदेचे अध्यक्ष श्री. अशोक घरत यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. ह्या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणुन श्रीमती मीनल मोहाडीकर व विशेष अतिथी म्हणून श्री. अशोक रावत उपस्थित होते. मीनल मोहोडीकर यांनी महिलांसाठी उद्योग ह्या विषयांवर तर अशोक रावत ह्यांनी ग्राहकांचे हक्क व कर्तव्य यावर मार्गदर्शन केले.

कै. आत्माराम नानाजी राऊत वरोर यांची जन्मशताब्दी (२३ ऑक्टोबर २०१४ ते २३ ऑक्टोबर २०१५) त्यांचे कुटुंबीय, नातेवाईक व मित्रपरिवार साजरी करणार आहेत. ह्या निमित्ताने २३-१०-२०१४ रोजी वरोर येथे कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे याची नोंद घ्यावी

**नैमत्तिक देणगी**

दिलीप हरिश्चंद्र पाटील रु. ५००

पुतणी शलाका प्रफुल्ल पाटील १० वी च्या परिक्षेत ९२% गुणांनी उत्तीर्ण झाल्याबद्दल -

**सो.पा.क्ष.स. संघाची २०१४-१५ सालाची व्यवस्थापक मंडळाची दुसरी त्रैमासिक सभा रविवार दि. ९-११-२०१४ रोजी सकाळी १०.३० वाजता डॉ. मधुकर ब. राऊत सभागृह पालघर येथे आयोजित केलेली आहे. याची सर्व सभासदांनी नोंद घ्यावी.**


पं. विं. चालनाकार अरविंद ह. राऊत
यांच्या स्मृतीस अभिवादन

*Nayan Gharat*
*Shashikant Gharat*
(M) : 9923457759
9270886444




**SUJATA TRANSPORT**
**SUJATA TRADERS**
***SUJATA EARTH MOVERS***

*Building Material Suppliers*
*Earth Cutting & Filling Contractor*

**At. Betegaon, Shantipada, Po. Boisar,**
**Tal. Palghar, Dist. Thane,**
**Email : sujatatransport06@gmail.com**

पं. विं. चालनाकार अरविंद ह. राऊत
यांच्या स्मृतीस अभिवादन

*Yogesh Raut*
(M) 09860461752
09226864646



**GAJANAN ENTERPRISE**

Building Material Suppliers
& Construction

**At Po. Umroli, Tal. Palghar, Dist Thane**

# पं. वि. चालनाकार अरविंद ह. राऊत व
# कै. आत्माराम नानाजी राऊत यांच्या स्मृतीस अभिवादन



जन्म २३-१०-१९१५
मृत्यू -२९-०३-१९९५

वरोर येथील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते आदिवासी सेवक, दिनबंधू, वृक्षमित्र व सर्वोदय कार्यकर्ते कै. आत्माराम नानाजी राऊत यांची जन्मशताब्दी वर्ष २३-१०-२०१४ ते २३-१०-२०१५ या काळात त्यांचे वरोर येथील स्नेही व कुटुंबियांकडून साजरे करण्यात येणार आहे. सोपाक्षस संघाचे पहिले मुख्य चिटणीस नानाजी विठू राऊत यांचे हे सुपुत्र. वडिलांच्या वनखात्यातील वनपाल या हुद्द्यामुळे त्यांनी आदिवासी विभागात सर्वोदय केंद्रातर्फे समाजसेवेस सुरुवात केली. इथेच त्यांना आचार्य भिसे ह्यांचा सहवास लाभला. महात्मा गांधी यांचे जन्मशताब्दी वर्ष डहाणू येथे साजरे करण्यात आले तेव्हा व्यावस्था समितीवर त्यांनी आचार्य भिसे समवेत काम पाहिले. त्या कार्यक्रमात सरहद्द गांधी खान अब्दुल गफारखान यांची उपस्थिती होती. ते डहाणू तालुका खरेदी विक्री संघाचे सदस्य होते. जंगल कामगार सोसायट्यांचे अध्यक्ष म्हणून काम पाहिले. सहकारी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांना प्रशिक्षित करण्यासाठी त्यांनी वरोर येथे शिबिर घेऊन यशस्वी केले. सन १९५५ साली अस्पृश्यता निवारण पुरस्कार वरोर गावाल मिळवून देण्यात त्यांचा मोलाचा वाटा होता. वृक्षावरील त्यांचे प्रेम, वृक्ष जगवा, वृक्ष वाढवा ह्या त्यांच्या सवयीमुळे परिसरातील लोक त्यांना वृक्षमित्र म्हणून संबोधित. १९६० साली ते आपल्या संघाचे उपाध्यक्ष होते. चालनाकार अरविंद राऊत ह्यांच्या बरोबर त्यांचे शालेय शिक्षण पूर्ण झाले. ते दोघेही शेवटपर्यंत परममित्र होते. विशेष बाब म्हणजे दोघांचा जन्म १९१५ व मृत्यु १९९५ सालाचा. दोघांच्याही जन्मशताब्दी वर्षानिमित्त त्यांना नातेवाईक, आप्तेष्ट व मित्र परिवाराकडून आदरांजली.

---

## आवाहन

• **वास्तुनिर्मिती निधी** - संघाने समाजाची वास्तु होण्यासाठी ठोस पावले उचलली आहेत. वास्तु निर्मिती निधी साठी समाजबांधवांनी सढळ हस्ताने भरघोस मदत करावी हि विनंती.

• **त्रैमासिक वृत्तपत्रिका निधी** - आपणास माहीतच आहे की वृत्तपत्रिका छपाई खर्च व वितरीत करण्याचा खर्च वाढतच आहे. सर्व समाजबांधवांना विनंती करण्यात येते कि, त्यांनी त्रैमासिक वृत्तपत्रिका निधी साठी वाढदिवस, लग्न, गौरव इ. नैमत्तिक निमित्ताने देणगी अथवा जाहिरात द्यावी. नैमत्तिक देणगी कमीत कमी रु. २०० व त्यानंतर रु. १०० च्या पटीत स्वीकारली जाईल.

• **शैक्षणिक मदत परतफेड** - सर्व समाज बंधू भगिनींना नम्र विनंती आहे की संघातर्फे वेळोवेळी करण्यात आलेली शैक्षणिक मदतीची परतफेड करावी.

---

## समाजवृत्त

सो. पा. क्ष. सहकारी पतसंस्थेचा वार्षिक सर्वसाधारण सभा दि. २७-९-२०१४ रोजी सकाळी १०.३० वाजता संघाच्या दहिसर कार्यालयात श्री. मोरेश्वर गजानन पाटील यांच्या अध्यक्षतेखाली पार पाडली. पतसंस्थेचे भाग भांडवल रु. ६० लक्ष पर्यंत पोहचले आहे तसेच कर्ज मर्यादा १५ लाखापर्यंत गेली असून एकत्रित कर्जाची मर्यादा २० लाख झाली आहे. अशी माहीती संस्थेकडून प्राप्त झाली आहे.

पं. वि. चालनाकार अरविंद ह. राऊत यांच्या स्मृतीस अभिवादन

Hero

**Kundan Raut**
Sales Manager

**STS Automobiles**
Authorised Dealer Hero Motocrop Ltd.
Shop No. 23, Riddhi Siddhi Bldg.,
Near HDFC Bank,
Kardal, Saphale (E)

M. 9226276822 / 9545978689
Eamil : kundanraut50@gmail.co,m

पं. वि. चालनाकार अरविंद ह. राऊत यांच्या स्मृतीस अभिवादन

✆ : 8149145427 ✆ : 9637282649


# श्री. शशांक हरिश्चंद्र राऊत - उमरोळी

**Civil contractor & Specialist for water proof contractor**

गट विभाग प्रमुख - उमरोळी गट (पंचायत समिती)
सदस्य - तंटामुक्ती - ग्रा.पं., उमरोळी

पं. वि. चालनाकार अरविंद ह. राऊत यांच्या स्मृतीस अभिवादन

**Nikunj Raut**
9270175226
7507067836



# HOTEL GULMOHAR


Family Restaurant
& Garden Bar

**Lodging Boarding**

Girish L. Raut
9850140780
7798421214

# Trimurti Estate Agent
# Mahalaxmi Transport

**Building Material Suppliers**



**Near Sarpada Stop, At & Post Umroli, Tal,-Dist.-Palghar,**

## श्रद्धांजली

| | नाव | गाव | तारीख | वय |
|---|---|---|---|---|
| १) | वत्सला वसंत पाटील | मांडे | २-८-२०१४ | ९४ |
| २) | हेमंत भीमाजी पाटील | नरपड | ३-८-२०१४ | ५२ |
| ३) | सीताबाई रामचंद्र ठाकूर | पंचाळी | ८-८-२०१४ | ८५ |
| ४) | संदेश काशिनाथ राऊत | वरोर | १७-८-२०१४ | ५२ |
| ५) | नीलांबरी नविनचंद्र राऊत | वसई-नरपड | २४-८-२०१४ | ६५ |
| ६) | शालीनी शाळीग्राम पुरव | जोगेश्वरी | १३-२-२०१४ | ८० |
| ७) | हेमंत हिरा राऊत | वरोर | १९-९-२०१४ | ६५ |
| ८) | जयवंत दाजी राऊत | नरपड | २२-९-२०१४ | ६५ |
| ९) | रजनी हरीभाऊ राऊत | केळवे | २७-९-२०१४ | ८० |
| १०) | तारामती हरिश्चंद्र राऊत | माहीम | २-१०-२०१४ | ९० |
| ११) | लीला हरेश्वर राऊत | माहीम | २-१०-२०१४ | ८१ |
| १२) | प्रभावती प्रभाकर पाटील | पंचाळी | ६-१०-२०१४ | ७२ |
| १३) | रजनीकांत काशीनाथ राऊत | वरोर | १३-१०-२०१४ | ६४ |


## त्रैमासिकपत्रिका जाहिरात दर

**वार्षिक (चार अंकासाठी)**

पाव पान - १५०० रु. ● अर्धे पान - ३००० रु. ● पूर्ण पान - ५००० रु.

वधु वर जाहिरात (पाव पान) ३०० रुपये ● सौजन्य रु. ५०० (एका अंकासाठी)


**सो. पा. क्ष. स. संघाची सभासद वर्गणी**

अधिदाता रु. ५,०००/-, वाली रु. २,०००/-, पालक १,०००/- आश्रयदाता रु. ५००/-, आजीव रु. २००/-

# सो.पा.क्ष.स.संघ व त्रैमासिक वृत्तपत्रिकेकडून दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा

# सर्व समाज बंधू भगिनीं, जाहिरात, देणगीदार हितचिंतक व वाचकांना दिवाळी सुख समृद्धीची व आनंदाची जावो.

पं. वि. चालनाकार अरविंद ह. राऊत यांच्या स्मृतीस अभिवादन


*Vipul N. Patil* 9226939065
9765349711

# SONALI TRADERS & TRANSPORT

At Salwad (Shivaji Nagar), Tal. Palghar, Dist. Thane 401 504

(O) - 9260617704
Boisar - 275495 / 260013

**Suppliers of : Steel, Building Materials,**
**Cement A.C. Sheets, Earth Movers**

Gala No. 25/26, Shroff Trade Centre, 4-Minakshi, Navapur Road, Boisar

✿ ✿ ✿

*Amol Raut* / 9423990757
*Sameer Raut* / 9823783889
*Sanjay N. Patil - 9422076283*

# CHAITALI

## ENTERPRISES

**Building Materials & Cement A.C. Sheets,**

At Salwad (Shivaji Nagar), Tal. Palghar,
Dist. Thane 401 504


---

**बुक - पोस्ट**

प्रति,
श्री. / श्रीमती ________________________

________________________

प्रेषक -
संपादक


**त्रैमासिक वृत्तपत्रिका सो. पा. क्ष. स. संघ**

कर्मवीर ज. पा. राऊत ग्रंथालय, विठ्ठलेश को. ऑप. हाऊ. सोसायटी,
दहिसर (प.), मुंबई - ४०० ०६८. दूरध्वनी : २८९२९४०७ email - spksstvpatrika@gmail.com

**संपादक व प्रकाशक : श्री. विनय रघुनाथ राऊत**

रजिस्ट्रेशन ऑफ न्यूज पेपर, भारत सरकार नोंदणी क्रमांक जी १६५/३२२/९९

**प्रसिद्धी स्थळ :** कर्मवीर ज. पा. राऊत ग्रंथालय, दहिसर (प.), मुंबई - ४०० ०६८.

**मुद्रक : ग्राफिक प्रिंटर्स,** कस्तूरपार्क, शिंपोली, मुंबई - ९२. दूरध्वनी : २८९९९३३०, ९३२२८४०८४६

इ-मेल : graphic_printers29@rediffmail.com